दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक २४२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२६ नोव्हेंबर २०२० ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ज्येष्ठ काँग्रेस नेते अहमद पटेल यांचे कोरोनाने निधन



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**
ज्येष्ठ काँग्रेस नेते, राज्यसभा सदस्य अहमद पटेल यांचे आज पहाटे निधन झाले. ते ७१ वर्षांचे होते. ऑक्टोबर महिन्यात पटेल यांना करोनाची लागण झाली होती. त्यानंतर दिल्ली जवळ गुरगाव येथील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. पटेल हे काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांचे राजकीय सल्लागार होते. गांधी कुटुंबाचे अत्यंत विश्वासू म्हणून त्यांची दिल्लीच्या राजकीय वर्तुळात ख्याती होती. शरीरातील बहुतांश अवयव निकामी झाल्याने बुधवारी पहाटे तीन वाजता त्यांचे निधन झाल्याची माहिती अहमद पटेल यांचा मुलगा फैजल पटेल यांनी ट्विटद्वारे दिली. अहमद पटेल यांच्या निधनानंतर राष्ट्रपती रामनाथ कोविंद, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, माजी अध्यक्ष राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी शोक व्यक्त केलं आहे.

# कोरोनासंबंधी केंद्राच्या मार्गदर्शक सूचना; निर्बंध लावता येणार, पण लॉकडाऊन नाही

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**
केंद्र सरकारने बुधवारी कोरोनाबाबत नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. राज्यांनी खबरदारी घेतली पाहिजे. देखरेख, कंटेन्मेंट आणि सावधगिरी बाळगताना कठोर रहावं लागेल. राज्यांना त्यांच्या परिस्थितीनुसार निर्बंध लागू करण्यास सूट देण्यात आली आहे, असं केंद्र सरकारनं म्हटलं आहे.
कंटेन्मेंट झोनमध्ये रात्रीची संचारबंदीही लागू करता येईल. पण कंटेन्मेंट झोन्या बाहेर स्थानिक पातळीवर लॉकडाउन लागू करण्यासाठी मंजुरी घ्यावी लागेल, असंही केंद्राने स्पष्ट केलं आहे. केंद्राची ही मार्गदर्शक सूचना १ डिसेंबरपासून लागू होणार आहे. करोनाविरूद्धच्या लढाईत आपण आतापर्यंत मिळवलेलं यश कायम राखलं पाहिजे, असं आवाहन केंद्रानं राज्यांना केलं आहे.
करोना रुग्णांची संख्या कमी होतेय हे देशातील ॲक्टिव्ह रुग्ण संख्येवरून स्पष्ट होतंय. पण सणासुदीच्या काळात काही राज्यांमध्ये नवीन रुग्णांमध्ये वाढ दिसून आली आहे. यामुळे संबंधित राज्यांना सावधगिरी बाळगावी लागेल आणि कंटेन्मेंट, देखरेख ठेवण्याच्या उपायांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल, असं मार्गदर्शक सूचनांमध्ये केंद्राने स्पष्ट केलं आहे.
कंटेन्मेंट झोनमध्ये राज्यांना नियमांचं काटेकोरपणे पालन करावं लागेल. देखरेख ठेवणारी यंत्रणा अधिक बळकट करावी लागेल. केंद्र सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे जिल्हा प्रशासनाला पालन करावं लागेल. स्थानिक परिस्थिती पाहता राज्यांना निर्बंध लागू करण्याची सूट देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यात तयार होणाऱ्या कंटेन्मेंट झोनची यादी आपल्या संकेतस्थळावर अपलोड करावी लागेल. ही यादी आरोग्य मंत्रालयालाही द्यावी लागेल.
कंटेन्मेंट झोनमधील नागरिकांच्या हालचाली रोखाव्या लागतील. अत्यावश्यक गोष्टींसाठीच फक्त सूट द्यावी. आवश्यक वस्तू आणि वैद्यकीय गरजांसाठी सूट असावी. करोनाची लक्षणं असलेल्या रुग्णांच्या शोधासाठी आरोग्य पथक घरोघरी जाऊन तपास करतील. निमांनुसार चाचणी करावी. संसर्ग असलेल्या व्यक्तींच्या संपर्कात येत असलेल्या नागरिकांची यादी तयार करून. त्यांची ओळख करावी आणि त्यांचा मागोवा घ्यावा आणि त्यांना क्वॉरंटाइन केलं जावं. करोना संसर्ग असलेल्या व्यक्तींवर त्वरित उपचार सुरू केले जावेत. शक्य असल्यास घरीच आयसोलेशनमध्ये ठेवावं. आवश्यक असल्यास रुग्णालयात दाखल करावं. ILI आणि SARI च्या रुग्णांवर देखरेख ठेवावी. मोबाइल युनिट त्यांच्या संपर्कात असावेत. निर्बंधांची अंमलबजावणी आणि नियमांचे पालन करण्याची जबाबदारी स्थानिक जिल्हा प्रशासन आणि पोलिसांची असेल. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना सर्व कार्यालयांमध्ये सोशल डिस्टन्सिंगचं पालन केलं पाहिजे. ज्या शहरांमध्ये साप्ताहिक १० पॉझिटिव्ह रुग्ण आढळून येत आहेत अशा शहरांमध्ये कार्यालयीन वेळेत बदल आणि इतर आवश्यक पावलें उचलावीत. सोशल डिस्टन्सिंग विचार घेता कार्यालयात एकाच वेळी अधिक कर्मचारी नसावेत, असं केंद्र सरकारने म्हटलं आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात पुन्हा कोरोना बाधित रुग्णांची वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**
राज्यात करोनाबाधित रुग्ण बरे होण्याच्या संख्येपेक्षा नवीन निदान झालेल्या रुग्णांची अधिक संख्येची मालिका गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. आज राज्यात ६ हजार १५९ नवीन रुग्णांचे निदान झाले आहेत त्यामुळं राज्यातील एकूण रुग्णसंख्या १७ लाख ९५ हजार ९५९ इतकी झाली आहे, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिली आहे.
राज्यात दिवाळीनंतर करोना रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. दिवाळीत बाजारात झालेली गर्दी, नातेवाईकांच्या भेटीगाठी यामुळं पुन्हा एकदा रुग्ण संख्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात होती. त्याप्रमाणे दिवाळीनंतर करोना मुक्त रुग्णांपेक्षा करोना बाधित रुग्णांचा आकडा वाढत चालला आहे. राज्याला या संकटातून बाहेर काढण्यासाठी मास्क, सॅनिटायझर आणि सुरक्षित अंतर, हीच त्रीसूत्री असल्याचं प्रशासनाकडून वेळोवेळी सांगण्यात येतंय. दिवाळीनंतर करोनाविरूद्धची ही लढाई निर्णायक टप्प्यावर आली आहे. आज राज्यात ६ हजार १५९ नवीन रुग्णांची वाढ झाली आहे. तर, आज ४ हजार ८४४ रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. राज्यात आता एकूण करोना मुक्त रुग्णांची संख्या १६ लाख ६३ हजार ७२३ इतकी झाली आहे. त्यामुळं राज्यातील एकूण रुग्ण बरे होण्याचे प्रमाण म्हणजेच रिकव्हरी रेट ९२. ६४ टक्के इतके झाले आहे. राज्यात करोना रुग्णसंख्या वाढत असताना राज्यात जिल्ह्यात मृत्यूदर नियंत्रणात ठेवणं शक्य झाले आहे. आज राज्यात एकूण ६५ करोना बाधित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर २. ६० टक्के इतका आहे.

## केंद्राच्या जनविरोधी कृषी-कामगार कायद्यांच्या विरोधात शेकापक्षाचा अलिबागमध्ये आज एल्गार

### वादळातील नुकसान भरपाई, विजबिलेमाफी, अतिवृष्टीतील नुकसानभरपाई आदी मागण्यांसाठी देणार लढा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**
केंद्राच्या जनविरोधी कृषी-कामगार कायद्यांच्या विरोधात शेतकरी कामगार पक्षाने शेकापक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केलेल्या रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावरील यल्गार मोर्चाची जय्यत तयारी पुर्ण झाली आहे. संपूर्ण जिल्हाभरातून कार्यकर्ते या मोर्चात सहभागी होणार आहेत. या मोर्चातून शेकापक्षाची ताकद दाखवित संपूर्ण अलिबाग लालेलाल करण्यात येणार आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. जयंत पाटील यांनी केले आहे. या मोर्चासाठी
शेकापक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या यल्गार मोर्चात अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष कॉ. अशोक ढवळे, शेकापक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार विवेक पाटील, आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार पंडितशेट पाटील, माजी आमदार धैर्यशिल पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, जिल्हा चिटणीस आस्वाद पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती ॲड निलीमा पाटील, समाजकल्याण सभापती दिलीप भोईर, महिला आघाडीच्या नेत्या नगरसेविका चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे अध्यक्ष नृपाल पाटील यांच्यासह सर्व पदाधिकारी, जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य, तालुका चिटणीस, सर्व सेलचे अध्यक्ष, पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.



केंद्र सरकारने शेतकरी आणि कामगारांना देशोधडीला लावण्याचा घाट रचला असून तो कदापी यशस्वी होऊ न देण्यासाठी केंद्र सरकार विरोधात २६ नोव्हेंबरला देशभरातील विविधी शेतकरी संघटनांनी देशव्यापी आंदोलन पुकारले आहे. रायगड जिल्ह्यातील निसर्ग चक्रिवादळात झालेले नुकसान अजूनही भरुन देण्यात आलेले नाहीत. कित्येक नुकसानग्रस्त अद्यापि मदतीपासून वंचित आहेत. झाड निहाय मदत देतानाही अतिशय अन्याय करण्यात आला आहे. कोरोनामुळे ओढवलेली भयंकर परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी आर्थीक मदत देण्याची गरज आहे. छोट्या मोठ्या उद्योगांना सरकारने मदत करण्याची गरज आहे. या काळात आलेले भरमसाठी विज बील पुर्णपणे माफ केलेच पाहिजे अशा विविध मागण्या देखील या मोर्चातून शासनापर्यंत पोहचविण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे अतिवृष्टीत उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांनाही पुरेशी नुकसान ..../२

## अमृत योजनेच्या कंत्राटदार निवडीला मंजुरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**
पनवेल महानगरपालिकेच्या ४०८ कोटींच्या अमृत पाणीपुरवठा योजनेचा मार्ग मोकळा झाला आहे. कंत्राटदार निवडीला निविदा समितीकडून मंजुरी मिळाली असून, महिन्याभरात कामाला सुरवात होणार आहे. त्यामुळे पुढील दोन वर्षांनंतर पनवेलकरांना मुबलक पाणी मिळणार आहे.
पनवेलमध्ये दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवते. ती दूर करण्यासाठी ४०८ कोटींची अमृत पाणीपुरवठा योजना महापालिकेने आखली आहे, मात्र सुरुवातीला कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे ही योजना मागील चार वर्षांपासून तांत्रिक अडचणीत अडकली होती. या संदर्भात भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांनी वेळोवेळी शासन-प्रशासनाचे लक्ष वेधले तसेच पाठपुरावाही केला होता. दरम्यान, महापालिकेचे तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख व विद्यमान आयुक्त सुधाकर देशमुख यांनी सचिवालयात हा विषय मांडला. या सर्व प्रयत्नांना यश येऊन महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या नस्तीला गती मिळाली आहे. या कामाचा कालावधी ३० महिन्यांचा आहे. यासाठी जेव्हीपीआर या कंपनीची निवड करण्यात आली असून, २४७ कोटी रुपयांची विविध कामे पुढील महिन्यापासून सुरु होणार आहेत.
या योजनेमुळे २२८ दश लक्ष लीटर पाण्याची उपलब्धता पाताळगंगा नदीतून पनवेलला होणार आहे. ..../२





**पूर्वाश्रमीच्या २८८ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना महाविकास आघाडीच्या सरकारने कायम केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री ना.मा.आदितीताई तटकरे यांची भेट घेऊन केलेल्या पाठपुराव्याबद्दल त्यांचे आभार मानले व मिठाई भरवून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे संतोष पवार(कार्याध्यक्ष), अनिल जाधव (सरचिटणीस) तसेच इतर पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

## २८८ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पनवेल महापालिकेत समावेशन

### आ.प्रशांत ठाकूर यांच्यासह मनपा सत्ताधाऱ्यांचे कर्मचाऱ्यांनी मानले आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**
पनवेल महापालिकेत काम करणाऱ्या पूर्वाश्रमीच्या २८८ ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे महापालिकेच्या सेवेत समावेशन करण्यात आले आहे.
या संदर्भातील मंजुरीचा जीआर राज्य शासनाच्या नगरविकास खात्याकडून काढण्यात आला आहे. यासाठी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांनी प्रयत्न व पाठपुरावा केला होता. पनवेल महापालिकेची १ ऑक्टोबर २०१६ रोजी स्थापना झाल्यानंतर तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींचा समावेश महापालिकेत करण्यात आला. या ग्रामपंचायतींमध्ये काम करणाऱ्या कर्मचार्यांनी महापालिकेत समावेश व्हावा अशी मागणी सातत्याने



लावून धरली होती, मात्र जिल्हा परिषदेकडून आवश्यक सहकार्य न मिळाल्याने समावेशन प्रकियेला लांबली. यासाठी नगरविकास विभागाने कोकण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. कोकण आयुक्तांनी नगरविकास विभागाला याबाबत २५ जानेवारी २०१९ रोजी अहवाल दिला. हा अहवाल सादर करूनही नव्या सरकारकडून निर्णय प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत होता. त्यामुळे या ..../२

## जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने दुखापत केल्याने ६० वर्षीय इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**
पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या गुन्हाच्या घटनेच्या मनात राग धरुन आपसात संगनमत करुन दोघा जणांनी एका ६० वर्षीय इसमाला लोखंडासारख्या हत्याराने त्यांच्या कपाळावर, डाव्या भुवयाजवळ जीवे ठार मारण्याच्या इराद्याने जोरात मारुन त्यांना दुखापत करुन नंतर हाताबुक्क्याने व लाथेने मारहाण करुन जीवे ठार मारल्याप्रकरणाचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.
खालीद अहमद शरिफ (६० रा.कोन गाव) यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यामध्ये एक गुन्हा दाखल करुन या गुन्ह्यासंबंधी पनवेल कोर्टामध्ये येवून परत घरी जात असताना यातील आरोपी अब्दुल माजीद देशमुख व त्याच्या सोबत असलेला एक इसम यांनी या घटनेचा राग मनात धरुन आपसात संगनमत करुन कोणत्यातरी लोखंडासारख्या हत्याराने त्यांच्या कपाळावर, डाव्या भुवयाजवळ जीवे ठार मारण्याच्या इराद्याने जोरात मारुन त्यांना दुखापत करुन नंतर ..../२

## बोर्लीपंचतन, दिवेआगर मधील एटीएममध्ये ठणठणाट ; पर्यटक हैराण





**दै.रायगड नगरी । दांडगुरी**
श्रीवर्धन - म्हसळा तालुक्यासह दक्षिण रायगड जिल्हात जवळपास सर्वच राष्ट्रीयकृत बँकांनी एटीएम' ची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. मात्र बँकांनी चांगली सेवा देण्याकडे मात्र संबंधित बँकांचे दुर्लक्ष होत आहे. तांत्रिक बिघाड, पुरेशा रकमेअभावी वारंवार एटीएम' मशिन बंद असल्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे.
श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील स्टेट बँक एटीएम,महाराष्ट्र बँकेचे एटीएम, महाड बँकेचे एटीएम तर दिवेआगर येथे बँक ऑफ इंडियाचे एटीएम,रायगड जिल्हा बँकेचे एटीएम असून या ठिकाणाहून दिवेआगर,वडवली, दिघी, शिस्ते, कापोली, कुडगाव तसेच दांडगुरी पंचक्रोशी आदी गावांतील तर दिवेआगर येथे मोठ्या संख्येने येणारे पर्यटक या एटीएम मशीन मधुन व्यवहार होतात. बँक ऑफ महाराष्ट्र,स्टेट बँक, रायगड जिल्हा मध्यवर्गीय बँक,महाड बँक तसेच पतपेठ्या शहरात असल्याने नेहमीच नागरिकांची धावपळ पाहायला मिळते.बोर्ली पंचतन शहरात तीन बँकेचे एटीएम आहेत. मात्र बहुतेक वेळी त्या तीनही मशीन शोभेच्या वस्तू बनतात. धावपळीच्या युगात रांगेत उभे राहून बँकेत पैसे काढण्यासाठी बहुतांश ..../२

## पोलादपूर तालुक्यातील सवाद येथील पहिली यात्रा यंदा कोरोना पार्श्वभूमीवर रद्द

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**
यंदा कोरोना संसर्ग पार्श्वभूमीवर पोलादपूर तालुक्यातील सप्तक्रोशीतील सवाद येथील श्रीमहाबळेश्वर देवस्थानची पहिली यात्रा रद्द करण्यात आली असून त्रिपुरारी पौर्णिमेच्या आयोजनासाठीही गर्दी टाळण्याचे बंधन सरकारच्या निर्देशानुसार असल्याचे पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांनी त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत स्पष्ट केल्याने ग्रामस्थ मंडळींनी त्यास मान्यता दर्शविली आहे. यामुळे पोलादपूर तालुक्यातील आगामी जत्रोत्सवावर निर्बंध असणार आहेत, हे स्पष्ट झाले आहे.
श्री क्षेत्र महाबळेश्वर ट्रस्ट सवादतर्फे पोलादपूर तालुक्यातील पहिली यात्रा सप्तक्रोशी परिसरात आयोजित करण्यात येत असते. मात्र, यंदा या यात्रेवर कोरोना संसर्गाचे सावट आल्याने दरवर्षी त्रिपुरारी पौर्णिमेच्या मुहूर्तावर रविवारी अपेक्षित असणारी ही यात्रा होणार नसल्याचे सोमवारी सायंकाळी पोलादपूर पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीनंतर स्पष्ट झाले आहे. ..../२

# उंच उंच उड्डाणे...

मुंबई वगळता इतर शहरांसाठी समान बांधकाम नियंत्रण नियमावलीला राज्य सरकारने अखेर मान्यता दिल्याने, गेल्या अनेक वर्षांच्या याबाबतच्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे; तसेच भविष्यातील महाराष्ट्राच्या नागरीकरणाची वाटचाल कशी असणार आहे, याचे उत्तरही या नियमावलीतून मिळणार आहे. बांधकाम क्षेत्राला संजीवनी देण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली आणखी एक उपाययोजना, असेही त्याचे वर्णन करता येईल; मात्र या सर्व खटाटोपानंतर सर्वसामान्यांच्या आवाक्यात असलेल्या घरांची निर्मिती होणार का, याचे उत्तर मिळण्यास अजून काही काळ वाट पाहावी लागेल. वेगाने शहरीकरण होत असलेले महाराष्ट्र हे देशातील सर्वांत आघाडीचे राज्य आहे. येथील शहरांची संख्या देशातील अन्य राज्यांपेक्षा अधिक आहे. गेल्या दोन दशकांमध्ये ही वाढ प्रचंड वेगाने होते आहे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी, म्हणजेच महापालिकांनी आपापल्या क्षेत्रानुसार बांधकाम नियंत्रण नियमावली तयार केली होती. त्यामध्ये कोणतेही समान सूत्र नव्हते. शहरीकरण होत असताना, ती वाढ आकाशाच्या दिशेने (व्हर्टिकल), की क्षितिज पातळीवर (हॉरिझाँटल) पद्धतीने होणे अपेक्षित आहे, याबाबतचे धोरणही नव्हते. त्याचे उत्तर या नियमावलीने दिले आहे. यापुढे महाराष्ट्रातील सर्व शहरे ही आता 'व्हर्टिकल', म्हणजेच आकाशाच्या दिशेने वाढणार आहेत. सुमारे पन्नास वर्षांपूर्वी बांधकाम क्षेत्रामध्ये चटई निर्देशांक (एफएसआय) ही संकल्पना आली. किती क्षेत्रफळावर किती बांधकाम करायचे, याचे ते सूत्र होते. शहरांची वाढ होऊ लागल्यानंतर ते बदलणे आणि त्यानुसार पायाभूत सुविधांची रचना करणे आवश्यक होते; पण त्याला हात लावण्याची हिंमत कोणत्याही राज्यकर्त्यांत नव्हती. या नियमावलीमुळे महाराष्ट्राची शहरे 'एफएसआय'च्या विळख्यातून बाहेर पडण्यास प्रारंभ झाला आहे, असे म्हणावे लागेल. आतापर्यंत राज्यात आधी शहरांची वाढ आणि मग झालेल्या वाढीचे नियोजन, असे काहीसे चित्र होते. ते बदलण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागणार आहेत. या नव्या नियमावलीमुळे शहरातील इमारतींच्या उंचीवर असलेली बंधने काढून टाकण्यात आली आहेत. साहजिकच प्रस्तावित इमारत उभी राहणार असलेल्या रस्त्याची रुंदी व भूखंडाचे क्षेत्रफळ सूत्रानुसार असेल, तर मुंबई महानगर, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर व नाशिक या शहरांत गगनचुंबी इमारती उभ्या करणे आता शक्य होईल. याचप्रमाणे सर्वसामान्यांची अडवणूक करण्यासाठी वापरले जाणारे बांधकाम परवानगीचे शस्त्रदेखील बोथट करण्यात आले आहे. बांधकाम करताना जिन्यांची रुंदी, सज्जाचे क्षेत्रफळ, खोलीची उंची अशा अनेक बाबींमध्ये सवलती पूर्वी मिळत होत्या. त्यासाठी वेगवेगळे नियम दाखविले जायचे. आता मात्र हे सगळे काही एकत्र करून, एकाच नियमाखाली आणले गेले आहे. साहजिकच सामान्य नागरिकांना त्यांचा फायदा मिळणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे बांधकाम व्यावसायिकांनाही आपल्या व्यवहारामध्ये पारदर्शकता बाळगणे अधिक सोपे होणार आहे. दीड हजार चौरस फुटांपर्यंत बांधकामाची परवानगी घेण्याची अट रद्द करण्यात आली असून, सादर केलेला प्रमाणित नकाशा हीच आता बांधकाम परवानगी असेल. त्याचप्रमाणे तीन हजार चौरस फुटांपर्यंतच्या भूखंडावरील परवानगी दहा दिवसांमध्ये देण्याची तरतूद करण्यात आली आहे. कोव्हिडसारखी आपत्ती लक्षात घेऊन, उंच इमारतींमध्ये आख्खा मजला मनोरंजन किंवा एकत्रित येण्यासाठी ठेवण्याची तरतूदही संबंधित नागरिकांना दिलासा देणारी ठरेल. 'रेरा' कायद्याच्या अंमलबजावणीनंतर राज्यातील बांधकाम क्षेत्राला मरगळ आली होती. गेली चार वर्षे हे क्षेत्र काहीसे सुस्त झाले होते. या निमित्ताने या क्षेत्राला पुन्हा एकदा भरारी घेणे शक्य होईल. त्याचप्रमाणे या मोठ्या शहरांमध्ये हक्काच्या घरकुलाचे स्वप्न पाहणाऱ्या सामान्यांनाही आपल्या ऐपतीनुसार घरे उपलब्ध होतील. अर्थात, 'व्हर्टिकल' वाढीचा निर्णय घेतल्यानंतर पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक या क्षेत्रांबरोबरच विजेचा नियमित पुरवठा याकडेही राज्य सरकारला विशेष लक्ष द्यावे लागणार आहे; कारण उंच इमारतींमध्ये पाणी पुरवठ्यापासून ते घरापर्यंत नेणाऱ्या लिफ्टपर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी वीज किंवा ऊर्जा खर्च करावी लागणार आहे. सध्या राज्यातील शहरांमध्ये भारनियमनाचा फटका बसत नसला, तरीही भविष्यात या शहरांची मागणी अधिक वाढणार हे गृहित धरून, विजेचेही नियोजन करणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्यासाठी आत्ताच्या काळातही अनेक शहरांचा सभोवतालच्या ग्रामीण भागांशी संघर्ष सुरू आहे. येत्या काळात त्याचेही समाधानकारक उत्तर शोधणे आवश्यक ठरेल. सांडपाणी आणि घनकचरा या समस्या देखील विक्राळ रूप घेण्याच्या अगोदरच त्यांच्यावरील उपाय शोधावे लागतील. त्याचप्रमाणे शहरे वाढली, की त्याचा ताण वाहतुकीवरही येणार आहे; त्यामुळे आत्तापासूनच सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आणि त्याचा वापर करण्यास अधिकाधिक प्रोत्साहन देण्याची गरज भासेल. हे निर्णय करताना, त्याला पूरक असलेल्या पायाभूत सुविधांच्या निर्माणासाठी राज्याचे धोरण काय असणार, त्यासाठी लागणारी गुंतवणूक कोण करणार, त्याला निधी कोठून येणार याचे उत्तरही सरकारने देणे आवश्यक आहे. काळाच्या ओघात ती उत्तरे मिळतील असे मानून चालणार नाही, तर त्यासाठी खरोखरच धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. अन्यथा हा निर्णय आत्मघातकी ठरू शकतो, याचे भान राज्यकर्त्यांनी आणि बांधकाम व्यावसायिकांनीही ठेवणे आवश्यक आहे. नियोजनबद्ध चांगली शहरे उभारायची, की बकाल वस्त्या वाढू द्यायच्या, हे या निमित्ताने ठरवावे लागेल.

# सिडको नळ जोडणी धारकांकरिता पाणी देयके ऑफलाईन माध्यमातून भरण्याच्या सुविधेमुळे मोठा दिलासा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबईतील सिडकोच्या नळ जोडणीधारकांच्या विनंतीनुसार व सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या निर्देशानुसार आता ऑनलाइनप्रमाणेच देयक स्वीकृती केंद्रांमार्फत (बिल कलेक्शन सेंटर) म्हणजेच ऑफलाईन माध्यमातून पाणी देयक भरण्याची सुविधाही सिडकोतर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑफलाईन माध्यमातून देयके भरता येत असल्यामुळे सिडको नळ जोडणी धारकांना मोठा दिलासा प्राप्त झाला आहे. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या या निर्णयाचा फायदा नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असून सिडको नळ जोडणी धारकांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

ऑफलाईन माध्यमातून देयक भरणा करण्यासाठी विविध नोडमधील पाणी देयक स्वीकृती केंद्रे त्याचप्रमाणे सिडकोच्या प्रत्येक नोडमधील नोडल ऑफीसमधूनदेखील ही सुविधा सुरू करण्यात आली असून, या केंद्रांवर अथवा सिडको नोडल ऑफीसमध्ये जाऊन ग्राहक आपले देयक रोख रक्कम, धनादेश (चेक), धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) या स्वरूपात भरू शकतात. तसेच देयक भरल्याची पावतीही नागरिकांना प्राप्त होत आहे.

ऑफलाईन माध्यमातून ज्या नागरिकांना पाणी देयके भरायची असतील अशा सिडकोच्या नळ जोडणीधारकांनी आपली देयके संबंधित नोडनुसार पुढे दिलेल्या केंद्रांवर भरावीत :- खारघर - सिडको कार्यालय, खारघर; कळंबोली/नावडे/तळोजा - सिडको कार्यालय, कळंबोली; कामोठे - पाणी पुरवठा कार्यालय, सेक्टर-६अ, कामोठे; पनवेल (पूर्व)/करंजाडे/काळुंद्रे - सिडको कार्यालय, पनवेल; पनवेल (पश्चिम) - सेक्टर-१२, पाण्याची टाकी, पनवेल; द्रोणागिरी - सिडको कार्यालय, द्रोणागिरी; उलवे - सिडको कार्यालय, उलवे; हेटवणे/सीबीडी सेक्टर-२१/२२ - रायगड भवन, सीबीडी.

# अंबा नदीतील कॉंक्रिटचा अडथळा दूर झाल्याने विसर्जन होणार सुरळीत : नागरिकांतून समाधान

**दै.रायगड नगरी । वाकण**



नागोठण्यातील अंबा नदीतील ऐतिहासिक पुलाच्या खाली टाकण्यात आलेले परंतू नंतर फुटून इतरत्र पसरलेले सिमेंट कॉंक्रिट ग्रामपंचायतीकडून नुकतेच कॉम्प्रेसरच्या सहाय्याने फोडण्यात आले. जुन्या पुलाला कोणताही धोका न पोहचविता गणेश विसर्जन स्थळी दरवर्षी अडथळा ठरणारे हे सिमेंट कॉंक्रिट काढण्यात आल्याने व पुढील वर्षापासून विसर्जन सुरळीत होणार असल्याने नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

नागोठण्यातील ऐतिहासिक ठेवा असलेल्या येथील अंबा नदीतील सुमारे पाचशे वर्षांपूर्वीच्या पुलाच्या डागडुजीच्या कामासाठी काही वर्षांपूर्वी पुलाच्या पायथ्याशी सिमेंट कॉंक्रीट करण्यात आले होते. मात्र कालांतराने हे कॉंक्रीट फुटल्याने ते नदीच्या पात्रात पसरले होते व त्यामधील पोलादी सळ्या बाहेर आल्या होत्या. अंबा नदीतील या ठिकाणीच नागोठण्यातील गणेशांचे विसर्जन होत असते. त्यामुळे या कॉंक्रीटमधून बाहेर आलेल्या सळ्या गणेश विसर्जनासाठी नदीत जाणाऱ्या नागरिकांना लागण्याच्या अनेक घटना घडल्या होत्या. मात्र आता ग्रामपंचायतीने हा फुटलेला सिमेंट कॉंक्रीट कॉम्प्रेसरच्या सहाय्याने पूर्ण फोडून विसर्जन स्थळावरील अडथळा दूर केला आहे.

# १ जानेवारी २०२१ च्या अर्हता दिनांकावर मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहिर

**दै.रायगड नगरी । आगरदांडा**

भारत निवडणुक आयोगाने १ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयादीचा पुर्ननिरीक्षण कार्यक्रम जाहिर केला आहे. दि.१७ नोव्हेंबर २०२० ते १५ डिसेंबर २०२० हरकती व दावे स्विकारले जातील मतदारयादीत नाव समाविष्ट होण्यासाठी त्यांनी फॉर्म नं.६ भरून देणे आवश्वक आहे.

मयत व स्थालांतरित मतदारांची नावे मतदार यादीतुन कमी करण्यासाठी फॉर्म नं.७ तसेच मतदार यादीत वय, लिंग , नाव यामध्ये दुरस्ती असेल तर फॉर्म भरण्यासाठी www.nvsp.in या पोर्टलचा वापर करता येईल. अंतिम मतदारयादी दि.१५ जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. मतदार यादीत नवीन मतदारांची नावे समाविष्ट करणे अथवा नोंदी मध्ये दुरस्ती करण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावेत. असे आवाहान मुरूड तहसिलदार- गमन गावित यांनी केले.

# जीवन प्रबोधीनी ट्रस्ट मुंबईकडून कृष्णा महाडिक यांना कोरोना योद्धा पुरस्काराने सन्मानित



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील सुपुत्र समाजभूषण कृष्णा महाडीक यांनी कोरोना महामारी मध्ये जीवाची पर्वा न करता गेली सात महिने रुग्णसेवा करणारे सामाजिक कार्यकर्ते रायगड भूषण कृष्णा महाडिक यांना कोरोना योद्धा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मा. कृष्णा महाडिक यांनी संपूर्ण लॉकडाऊन मध्ये मुंबईतील सरकारी हॉस्पिटलमध्ये ब्लड बँकांना जवळ जवळ ७५०० बॉटल ब्लड जमा करून दिले. तसेच मुंबईतील सरकारी हॉस्पिटल मध्ये वेगवेगळ्या प्रकारे मदत केली.बाहेरगावाहून आलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची जेवण व राहण्याची सोय केली. रायगड जिल्ह्यात ३ जून रोजी मोठे चक्रीवादळ झाले.त्या चक्रीवादळात शाळांचे भरपूर मोठ्या प्रमाणात नुकसान झाले काही शाळा उध्वस्त झाल्या. कृष्णा महाडिक यांनी पाच तालुक्यातील २३ माध्यमिक शाळांना देणगीदारांकडून आर्थिक मदत घेऊन सर्व शाळा पुन्हा उभ्या केल्या. या सर्वांची दखल घेऊन श्री कृष्णा महाडिक यांना मुंबईतील जीवन प्रबोधिनी ट्रस्टतर्फे शाल श्रीफळ व मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. श्रीकृष्ण महाडिक यांचा सन्मान करत असताना जीवन प्रबोधिनी ट्रस्टचे संस्थापक सत्यवान नर, अध्यक्ष अमित पवार, सरचिटणीस हेमंत मकवाना, नाना पालकर ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी सुदेश राज शिर्के उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.अश्विनी अशोक देवळेकर, रा.गिरगाव मुंबई, २) श्रीमती. छाया शशिकांत पोतदार, रा.कळंबादेवी मुंबई यांना फाईल नं.१९३, येथील कळंबोली/रोडपाली नोड, प्लॉट नं.९/३३ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई, कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड शेतकरी यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक १९३ कळंबोली/रोडपाली नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| कळंबोली/रोडपाली | २० | ९/३३ | ९९.७४ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यार कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.१८, हिस्सा नं.८ ब या मिळकतीचे एकूण क्षेत्र ०-०९-०० या शेत मिळकतीचे त्या मिळकतीसमोर लिहिलेल्या मालक / कब्जेदार यांचेकडून आमचे अशिल कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेणार आहेत. सदर मालक / कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहे. सदर शेत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : खानाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदारांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.नारायण परशुराम दिसले | १८ | ८ ब | ०-०९-०० | १=०६ |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक/कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/११/२०२०

**सही/-**
**श्री.एच.ए.भगत**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**सुशिल प्राईड, २०१-२०२, गार्डन**
**हॉटेलजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८०८०२०२२७२**

वारसाचं सर्टिफिकेटबद्दल जाहीर नोटीस

ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे मोहंती
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं. ४७८/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०१/२०२१

श्री.जयंतीलाल हिरजी पॅरासिया
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती
राहणार आनंदसागर, आनंदसार
नखत्राना कच्छि, गुजरात-३७०६१० — अर्जदार
विरुद्ध
निरंक — सामनेवाला

वरील अर्जदार श्री.जयंतीलाल हिरजी पॅरासिया, यांचा मुलगा कै. श्री.अमित जयंतीलाल पॅरासिया उर्फ अमित जयंतीलाल पटेल यांचे दि.१९/०३/२०१९ रोजी, अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर नं.२३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे निधन झाले, यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**फ्लॅट नं.६०५, सहावा मजला, गणेश दर्शन, प्लॉट नं.ए-३५, सेक्टर नं.१८, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र. क्षेत्रफळ ३१.४३३ चौ.मी. कारपेट एरिया आणि टेरेस एरिया ४.२९७ चौ.मीटर**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५/११/२०२० रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शेकापक्षाचा अलिबागमध्ये आज एल्गार

भरपाई मिळावी. रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित औदयोगिक कारणांसाठी जमिन खरेदी करताना मुळ शेतकर्यांवर अन्याय न करता त्यांना पन्नास टक्के हिस्सा मिळण्याची मागणीही करण्यात येणार आहे.

## अमृत योजनेच्या कंत्राटदार निवडीला मंजुरी

योजना पूर्णत्वास आल्यानंतर पनवेल महापालिकेला यातील १०० एमएलडी, एमएमआरडीए क्षेत्राला १९, जेएनपीटी बंदराला ४०, तर सिडको वसाहतींना ६९ एमएलडी पाणी मिळणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने महापालिका व इतर प्राधिकरणांसोबत करार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

## पनवेल महापालिकेत समावेशन

कर्मचाऱ्यांनी आंदोलनेही केली. अखेर २८८ कर्मचार्यांचा महापालिकेच्या सेवेत समावेश करण्यास नगरविकास खात्याने सोमवारी (दि. २३) मंजुरी दिली. त्यामुळे या कर्मचार्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

समावेशन झालेल्या कर्मचार्यांच्या प्रतिनिधींनी आमदार प्रशांत ठाकूर आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांना पेढे भरवून धन्यवाद दिले. आपल्या सहकार्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याची नम्र भावना त्यांनी या वेळी व्यक्त केली. नगरसेवक नितीन पाटील, म्युन्सिपल एम्प्लॉइज युनियनचे ॲड. सुरेश ठाकूर व सहकारी उपस्थित होते.

या संदर्भात प्रतिक्रिया देताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पनवेल महापालिकेची १ ऑक्टोबर २०१६ स्थापना झाली, तेव्हापासून महापालिकेच्या सेवेत असणार्या ग्रामपंचायतींच्या कर्मचार्यांच्या दृष्टिकोनातून आज अतिशय आनंदाचा दिवस आहे. या कर्मचार्यांचा ॲड. सुरेश ठाकूर व सहकार्यांसह प्रशासन, राज्य शासनाशी समावेशनासाठी लढा सुरू होता. या संघर्षाला यश आले आहे. या संदर्भात आपल्या सोबतीने मलाही वेगवेगळ्या पद्धतीने पाठपुरावा करता आला. या सार्याचे फळ आज मिळतंय. २८८च्या पुढचे जे कर्मचारी राहिले आहेत त्यांनाही सामावून घेण्यासाठी आपण प्रयत्नशील आहात आणि येणार्या काळात ही प्रक्रियासुद्धा पूर्ण होईल याची मला खात्री आहे. महत्त्वाच्या टप्प्यावर यश आल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन!

## ६० वर्षीय इसमाचा मृत्यू

हाताबुक्क्याने व लाथेने मारहाण करून जीवे ठार मारल्याने त्यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक कोळी करीत आहेत.

## बोर्लीपंचतन, दिवेआगर मधील एटीएममध्ये ठणठणाट

नागरिकांकडे वेळ नाही. त्यामुळे अशा ग्राहकांनी एटीएम' सेवेचा वापर करण्यास सुरवात केली आहे. नव्याचे नऊ दिवस' बँकेने चांगली सेवा दिली होती. परंतु कालांतराने बँकेच्या सेवेत त्रुटी निर्माण झाल्या. त्यामुळे पेटोल पंपावरील बँकेंची एटीएम' सेवा असून अडचण नसून खोळंबा' अशीच झाली आहे.दिवेआगर, दिघी - जंजिरा पर्यटन स्थळी जाणाऱ्या पर्यटकांची नेहमी वर्दळ या ठिकाणी असते. विशेष म्हणजे एटीएममध्ये सातत्याने पैसे नसल्याने स्थानिकांसह पर्यटकांना ही त्रास होतो. कार्ड ज्या बँकेच्या आहे त्या एटीएम मध्ये पैसे नसल्यास आर्थिक भुर्दंड असताना देखील इतर बँकेच्या एटीएम चा वापर करतात. मात्र तिथेही रक्कम काढता येत नसल्याने ग्राहक संताप व्यक्त करतात. याकडे शेजारीच असलेले बँक अधिकारी हात वर करून मोकळे होतात.

पुण्याहून अनेक पर्यटक डेबिट कार्ड द्वारे पेमेंट करायला विचारतात मात्र स्वाईप मशीन सुविधा नसल्याने त्यांचाही खोळंबा होतो. कॅश काढायला गेले तर अनेकदा एटीएम बंद असते. शिवाय बँकांकडून देखील दुर्लक्ष होत असल्याने कॅशलेस मोहीम कालबाह्य झाल्याचे दिसते. आयडिया, डोकोमो व व्होडाफोन इंटरनेट नसल्याने स्वाईप मशीन आणूनही फायदा होत नसल्याचे दुकानदार सांगतात.

## पहिली यात्रा यंदा कोरोना पार्श्वभूमीवर रद्द

या बैठकीला ट्रस्टचे अध्यक्ष, सप्तक्रोशीतील पोलीस पाटील, ग्रामस्थ व भाविक मंडळी तसेच कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमानुसार नियम व अटीनुसार यात्रा भरविण्यास परवानगी नसून त्रिपुर लावण्यासाठी व पालखी सोहळ्यासाठी केवळ ८ ते १० माणसांना परवानगी देण्यात येणार आहे. यावेळी कोणत्याही प्रकारच्या दुकानदारांना,लाऊड स्पीकर व खालुबाजा वाजविण्यास, तमाशे तसेच करमणुकीच्या कार्यक्रमांना तसेच कोणत्याही प्रकारची गर्दी जमण्यास परवानगी नसल्याचे स्पष्ट करण्यास आले आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास कोविड-१९ पार्श्वभूमीवर निर्माण केलेल्या नियमांच्या उल्लंघनासंदर्भातील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची भुमिका पोलादपूर पोलीसांकडून स्पष्ट करण्यात आली आहे. यामुळे सर्व श्रीक्षेत्रमहाबळेश्वर शंकर मंदिराच्या भाविक श्रध्दाळूंनी येत्या, रविवार, दि. २९ नोव्हेंबर २०२० रोजी त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त तसेच यात्रा होणार नसल्याने सवाद येथील मंदिरामध्ये गर्दी करू नये, असे आवाहन श्री क्षेत्र महाबळेश्वर ट्रस्ट सवादतर्फे करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## विविध स्पर्धेचे बक्षीस समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी नवदूर्गा नवरात्रौत्सव मंडळ बोरी आणि बोरी ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमान दिवाळी सणानिमीत्त किल्ले, रांगोळी आणि कंदिल स्पर्धांचे आयोजन लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत, लहान मुलीं पासून ते सर्व वयोगटातील महिलांसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांचा बक्षीस समारंभ काल करण्यात आला.

किल्ल्यांचे महत्व आजच्या पिढीला कळावे यानिमित्ताने गड किल्ल्यांबाबतची माहीती व त्याचे वाचन होत आहे. संस्कारभारती या रांगोळीने संस्कारांचे जतन होत आहे. टाकाऊ पासून टिकाऊ कंदिल बनवून कृतीशीलतेमध्ये वाढ होणे हा प्रमुख उद्देश आहे. या स्पर्धेचा बक्षिस समारंभ उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू, चॅनलचे प्रतिनिधी विरेश मोडखरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी पार पडलेल्या कंदिल स्पर्धेत, टाकाऊपासून टिकाऊ, प्रथम क्रमांक दिपक ठाकूर, द्वितीय क्रमांक संकेत नागवेकर, तृतिय क्रमांक सौ. हर्षदा विशाल कोळी, रांगोळी स्पर्धा – संस्कार भारती प्रथम – सौ. हर्षदा विशाल कोळी, द्वितीय – सौ. कृतिका कुंदन पानसरे, तृतिय – वैष्णवी सुभाष जाधव, उत्तेजनार्थ – सौ. अंकिता कुणाल पवार, सौ. सारा संजू कांबळी, सौ. मेघना महेश चोपडेकर, कु. अर्पिता अरविंद पवार.किल्ले स्पर्धा– रायगड प्रतिकृती प्रथम कु. कौस्तुभ दत्ता मालुसरे व सहकारी, द्वितीय – कु. जल सचिन थळी व सहकारी, तृतिय – कु. रुचित परब व सहकारी, उत्त–ेजनार्थ – निवेश प्रफुल्ल म्हात्रे व सहकारी, अभिनव गुप्ता व सहकारी विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सहभागी झालेल्यांनाही भेटवस्तू देण्यात आल्या. यावेळी मंडळाचे माजी अध्यक्ष आणि उरणचे माजी नगराध्यक्ष परमानंद करंगूटकर, मंडळाचे माजी अध्यक्ष नंदन पानसरे, मंडळाचे अध्यक्ष आणि विद्यमान नगरसेवक अतुल ठाकूर, मंडळाचे माजी कार्याध्यक्ष संतोष पवार, मंडळाचे उपाध्यक्ष विशाल चौकेकर, मंडळाचे सचीव सुदेश साळुंखे, दिलीप साळुंखे, नंदकुमार पाटील, माजी खजिनदार हेमंत अधिकारी, विजय सतेरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# पोलादपूर नगरपंचायतीच्या निवडणुकीचे बिगूल वाजले

## २७ नोव्हेंबरला आरक्षण-प्रभाग रचना प्रारूप २ डिसेंबरला

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्याची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूर ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपंचायतीमध्ये झाल्यानंतर पहिल्या निवडणुकीमध्ये शिवसेनेची प्रचंड बहुमताची सत्ता स्थापन झाल्यानंतर गेल्या पाच वर्षाच्या सत्ताधिशांच्या कारकिर्दीची सांगता लवकरच होणार की सत्ताधिशांना पोलादपूरकर मतदार जनतेकडून मुदतवाढ मिळणार, याबाबत प्रचंड उत्कंठा निर्माण झाली असताना सरकारी कार्यक्रमाकडे विविध राजकीय पक्षांसह पोलादपूरकरांचे लक्ष लागल्याचे गेल्या महिन्यापासून चित्र दिसून येत होते. पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी नियमांना आधीन राहून मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर २०२० रोजी काढलेल्या सुचनेनुसार आरक्षणाबाबतचा कार्यक्रम दि. २७ नोव्हेंबरला आणि प्रभाग रचना प्रारूप कार्यक्रम दि. २ डिसेंबररोजी आयोजित करण्यात आल्याचे जाहिर केले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगर अधिनियम १९६५ मधील कलम १० अन्वये सर्व आरक्षण नमूद करूनच प्रभाग रचनेचे प्रारूप प्रसिध्द करण्यात यावे, असे सुचित करण्यात आले आहे. यामुळे नगरपंचायत क्षेत्रात सभा आयोजित करून अनुसुचित जाती महिला, अनुसुचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग महिला आणि सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण निश्चित करणे बंधनकारक आहे. यासाठी मुख्याधिकारी विराज लबडे यांना रायगड जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी दिलेल्या अधिकारानुसार महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या नियंत्रणाखाली मा.स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृह पोलादपूर शहर येथे शुक्रवार, दि. २७ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी ११ वाजल्यानंतर आरक्षणासंदर्भातील सभेचे आयोजन करण्यात आल्याचे मुख्याधिकारी लबडे यांनी सांगितले. यानंतर बुधवार, दि. २ डिसेंबर २०२० रोजी प्रभाग रचनेचे प्रारूप प्रसिध्द करण्यासाठी मा.स्व.बाळासाहेब ठाकरे सभागृह पोलादपूर शहर येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रारूपाबाबत कोणत्याही हरकती व सुचना असल्यास पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्या कार्यालयामध्ये बुधवार, दि. ९ डिसेंबर २०२० पर्यंत सादर करण्यात येण्याची मुदत देण्यात आली आहे. या सु–चना आणि हरकतींबाबत अर्जदारांना म्हणणे मांडण्यासाठी बोलावून घेण्यात येणार आहे. त्यामुळे प्रभाग रचना प्रारूप निश्चिती आणि आरक्षणाच्या या सभांच्या कार्यक्रमांची घोषणा झाल्यामुळे पोलादपूर शहरामध्ये नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांमध्ये मानसिकता वाढीस लागलेली दिसून येत आहे.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलला जाईल, अथवा कसे, याबद्दल अनिश्चितता असूनही प्रभाग रचना प्रारूप आणि आरक्षण सादर करण्याचा सरकारी कार्यक्रम निर्धारित वेळेत सुरू होणार असल्याने आता खालू वाजल्यावर राजकीय पक्षांच्या इच्छुक कार्यकर्ते उमेदवारांचे राजकारणाच्या लेझिम धरून नाचण्यासाठी अंग धरायला लागलं आहे.

**मतदार यादीमध्ये नांवे नोंदविण्याचे आवाहन**

दरम्यान, भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार आणि मुख्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र यांच्या पत्राप्रमाणे १ जानेवारी २०२१ या अर्हता दिनांकावर मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. दि. १७ नोव्हेंबर २०२० रोजी प्रसिध्द झालेल्या मतदार यादीबाबत १५ डिसेंबर २०२० पर्यंत दावे व हरकती दाखल करण्याची मुदत असून ५ जानेवारी २०२१ पर्यंत दावे निकालात काढून अंतिम मतदार यादी दि. १५ जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. पोलादपूर शहर आणि तालुक्यातील सर्व मतदार केंद्रांवर विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलादपूर तहसिल कार्यालयामधून देण्यात आली आहे.

याकाळात मतदार यादीमध्ये नांवे नोंदणीसह नावे वगळण्याचा कार्यक्रमही राबविण्यात येणार असल्याने अधिकाधिक नवमतदार, जनतेने नांवे नोंदविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे यावेळी पोलादपूर तालुक्यातील जनतेला सांगण्यात आले आहे.

# लोणेरेतील गृहस्थाचा प्रामाणिकपणा : सापडलेली पैशांची बॅग केली परत

**दै.रायगड नगरी । माणगाव**



आजकाल माणसाची नियत फार बदलली असल्याची नेहमीचीच ओरड आहे. परंतु या स्वार्थी जगात अजूनही काही माणसे पैशापेक्षा आपली ईमानदारी व आपल्यावर झालेल्या चांगल्या संस्कारांची प्रचिती विवेकपूर्ण व चांगल्या कार्यातून निदर्शनास आणून देतात.

दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मुंबई– खारघर येथून सकाळच्या सुमारास गणपतीपुळे या आपल्या गावी मोटारसायकलवरुन मध्यमवर्गीय केळकर मायलेक जात असताना त्यांच्या पाठीला असलेल्या सॅकबॅगमधून काही कपडे व पैशाची बॅग रस्त्यावर पडून गेले. व त्यांना त्याचं भानही नव्हतं. ते तसेच पुढे निघून गेले. पुढे पोलादपुरला आल्यानंतर त्यांना ध्यानात आलं. लोणेरेत ईलेक्ट्रीशनचे दुकान असलेले ५५ वर्षीय महेश महामुणकर हे नेहमीप्रमाणे सकाळी महाडवरून लोणेरेच्या दिशेने जात असताना वहूर गावच्या हद्दीत त्यांना रस्त्यावर ती बॅग आढळून आली. त्या बॅगेत सुमारे आठ हजार रुपये रोख रक्कम, एटीएम कार्ड, आधारकार्ड, ड्रायव्हिंग लायसन व घरच्या लॉकरची चावी होती. परंतु महामुणकरांना या सापडलेल्या बॅगचा लोभ झाला नाही. त्यांनी प्रामाणिकपणे त्या ड्रायव्हिंग लायसनद्वारे त्या केळकर कुटुंबियांचा तपास करून त्यांना लोणेरेत बोलावून त्यांच्या स्वाधीन त्यांची बॅग परत केली.

बॅग सापडल्याचा आनंद व कृतज्ञपणा केळकर कुटुंबियांच्या चेह–यावर पाहून महेश महामुणकराना जे आत्मसमाधान झालं त्याचं मोल खरचं पैशात न मोजता येण्यासारखं आहे. महामुणकरांकडून केळकर कुटुंबियांना पैशाची बॅग प्रामाणिकपणे परत देताना दोंघाच्या भावना काय असू शकतील ते फक्त नितीमत्ता व संस्कार टिकवून ठेवणा–या विभूतींनाच माहीत...!

# मित्राकडे जातो असे सांगून घराबाहेर पडलेला इसम घरी परतलाच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर रेल्वे स्टेशनवरुन मित्राकडे जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम आज पावेतो घरी परत न आल्याने तसेच मोबाईल फोन बंद असल्याने तो हरविल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अविनाश भोजने (४०) असे या इसमाचे नाव असून रंगाने गोरा, नाक सरळ, केस बारीक, पायात काळे शुज, तसेच अंगात फुल बाह्याचा ऑरेंज रंगाचा शर्ट व चॉकलेटी रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे. त्याला मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलीस ठाणे ०२२–२७७४२५०० किंवा पो.हवा.सचिन गोसावी भ्रमणध्वनी ९५९४३९५०५० येथे संपर्क साधावा.


मा.श्री.पाठक साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विशाल अनंत मुंडकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं. ५२९/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०१/२०२१

१) श्री.शेखर गजानन देशमुख
वय : ४९ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.अशोक गजानन देशमुख
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.मु.सवणे, पो.आपटे, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.संगीता रमेश मांडे
वय : ३७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.तळेगाव, पो.पोयंजे, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार यांची आई कुसूम गजानन देशमुख या दि.२६/०१/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर कुसूम गजानन देशमुख, यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर संपादीत मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे :–

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस क्रमांक | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| गव्हाण–२६७ | ६० | ३ | ०–१४.७ |
| | १२३ | १+२ | ०–२५.७ |
| | ६० | ५ | ०–६.३ |
| मौजे : उलवे, येथील सेक्टर १९, भूखंड क्र.२०७ क्षेत्र ४०० चौ.मी. | | | |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत कुसूम गजानन देशमुख व त्यांच्या इतर सामाईक मालकांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदारांनी ते मयत कुसूम गजानन देशमुख, यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२५ माहे ११ सन २०२० रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.पाठक सो.

वकील : किशोर करावकर व
ॲड.शितल करावकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं. ५४०/२०२०
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०१/२०२१

१) श्री.मोतीराम बाबु करावकर
२) श्री.पांडुरंग बाबु करावकर
३) श्री.जयवंत बाबु करावकर
४) श्रीम.द्रोपदी तुळशीराम नाईक
वरील सर्व रा.कोल्ही (कोपर)
ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीम.बेबी बबन गायकवाड
रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदारांचे वडील कै.बाबु धर्मा करावकर यांचे दि.२३/१०/२०१९ रोजी मु.कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून वरील अर्जदार यांनी कै.बाबु धर्मा करावकर यांच्या खालील नमूद मिळकतीसंबंधी वारसदाखला मिळण्याकरिता या ना.न्यायालयात अर्ज केलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| अनु क्र. | भूसंपादन निवाडा क्र. | वाटप केलेल्या मिळकतीचे तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | भूखंडाचे वाटपाचे स्थळ | सेक्टर नं. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
| १ | कोल्ही– KOL-ICIGD-77 | वडघर | ३ | १८८ | ३७० |
| २ | पारगाव डुंगी ८७ | पुष्पक नगर दापोली | ३ | ३२९ | ५४० |
| ३ | पारगांव १०५ | पुष्पक नगर दापोली | ७ | १६ | २९०० |
| ४ | ओवळे १३४ | पुष्पक नगर दापोली | ३ | १८० | १९० |
| ५ | ओवळे १४५ | पुष्पक नगर दापोली | ७ | ८४ | ७२० |
| ६ | पारगांव डुंगी १५५ | पुष्पक नगर दापोली | ३ | १८५ | १९० |
| ७ | पारगांव १३० | पुष्पक नगर दापोली | ६ | ३३ | ३५० |
| ८ | पारगांव ८९ | – | – | – | – |

याप्रमाणे भूखंडाचे वर्णन आहे.

तरी सदरचे अर्जदार हे कै.बाबु धर्मा करावकर यांचे सदर मिळकतीचे कायदेशीर वारस असून त्यांच्या वारस हक्कांबाबत कोणाही व्यक्तींस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती ना.न्यायालयात दाखल कराव्यात.

वरील अर्जास विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे सदर चौकशी अर्जाचे कामी वारस दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.२५/११/२०२० रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



प्रो.जमा रु.१००/– — ॲड.एस.एस.यंदारकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं. ४८८/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०१/२०२१

१) श्रीमती.पार्वती महादेव म्हात्रे
वय : ७० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.अविनाश महादेव म्हात्रे
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.बी.२०२, गुलमोहर अपार्टमेंट,
प्लॉट नं.१४६, सेक्टर १०,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.सचिन महादेव म्हात्रे
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ३ यांचे वडील कै.महादेव गणा म्हात्रे यांचा मृत्यू दि.२९/०६/२०२० रोजी मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. तसेच अर्जदार नं.१ यांच्या सासू व अर्जदार नं.२ ते ३ यांच्या आजी कै. कृष्णाबाई गणा म्हात्रे यांचा सुद्धा मृत्यू मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हे कै.महादेव गणा म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदार मे.कोर्टास कळवितात.

कै.महादेव गणा म्हात्रे यांचे नावे वडिलोपार्जित मालकीची ताबेकब्जेवहिवाटीत असलेली तसेच प्रत्यक्ष कसवणुकीतील खालील वर्णनाची शेतजमिनीची मिळकत होती व आहे. सदरची मिळकत ही महाराष्ट्र शासनाने नव्या मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केलेली आहे. सदर मिळकतींच्या अवॉर्ड सदरी कै.महादेव गणा म्हात्रे यांच्या नावाची नोंद आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | ॲवार्डप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | ५ | १ | ०–१४–९ | ०.३९ | ४०३५८.४० |
| | ५ | २ | ०–१९–५ | ०.६९ | |
| | ९४ | ७ | ०–४७–० | ७.०० | |
| | ९५ | ८ | ०–४३–५ | ७.०० | |

अर्जदार यांचे वडील कै.महादेव गणा म्हात्रे यांस २२.५ टक्के योजनेंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड वाटपित करण्यात आलेला आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भूखंडाचा तपशिल**

| जिल्हा | तालुका | भूखंडा खालील गाव जमीन मौजे | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|---|
| रायगड | पनवेल | VAHAL | PUSHPAK | २४ | ३०१ | ३८९.८४ |

वरील मिळकतीपासून मिळणाऱ्या भूखंडाचा लाभ अर्जदार यांस मिळणेकरिता वारसदाखला मिळण्याकामी अर्जदार याने अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदाराकडून कायदेशीर साक्षीपुरावे नोंदवून अर्जदारास वारसदाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

आज दि.१०/११/२०२० रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



ॲड.सुनील एन.मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं. ५०६/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०१/२०२१

श्री.रामचंद्र पांडुरंग रांधे
वय : ७० वर्षे, धंदा : काहीनाही
रा.घर नं.३०८, शिलोत्तर रायचुर,
(सुकापूर), ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.लक्ष्मण पांडुरंग रांधे
वय : ६६ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.२५/२, विठ्ठल मंदिर जवळ,
सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.जनार्दन पांडुरंग रांधे
वय : ५६ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.६७/१, सुकापूर बस स्टॉपजवळ,
सुकापूर, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्रीमती.हिराबाई सुभाष बेळे
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१२४/१, सुकापूर बस स्टॉपजवळ,
सुकापूर, पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड
कै.मिराबाई तुकाराम शिंदे (मयत) यांचे वारस
४) श्री.दिनेश तुकाराम शिंदे
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
५) सौ.वैशाली श्रीकांत कांबळे
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
दोघेही रा.२०२, क्लासिक कॅस्टल सी.एच.एस.,
दुसरा मजला, सेक्टर नं.१२, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार व सामनेवाले क्रमांक १ व २ यांचे वडील व तसेच सामनेवाले क्रमांक ४ व ५ यांचे आजोबा कै.पांडुरंग महादेव उर्फ महादू रांधे यांच्या मालकीची व ताबेकब्जातील खालील नमूद केलेल्या मिळकतींच्या ७/१२ सदरी अर्जदार व सामनेवाले क्रमांक १ व २ यांचे वडील व तसेच सामनेवाले क्रमांक ४ व ५ यांचे आजोबा कै.पांडुरंग महादेव उर्फ महादू रांधे यांच्या नावाची नोंद आहे. तसेच अर्जदार व सामनेवाले यांच्याही नावाची नोंद आहे. वर नमूद केलेल्या मिळकतींमध्ये कै. पांडुरंग महादेव उर्फ महादू रांधे हे एकमेव मालक होते. कै.पांडुरंग महादेव उर्फ महादू रांधे हे तारीख १४/१२/२००८ रोजी मयत झालेल्या असून त्यांनी तारीख २९/१२/२००० रोजी अर्जदार व सामनेवाले यांच्या नावाने त्यांच्या हिश्याचे रजि. मृत्यूपत्र तयार करून ठेवलेले आहे. सदर मृत्यूप्रमाणे प्रोबेट मिळणे करीता सदरचा अर्ज अर्जदार आज रोजी मे.कोर्टात दाखल केला आहे.

**मिळकतींचे वर्णन (जुने सर्व्हे नंबर)**
**मौजे : शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | ४५/१८ | ४–११–० | ३८.३६ |
| २ | ४५/१९ (२) | ०–१७–७ | २.४७ |
| | | ४–२८–७ | ४०.८३ |

**मिळकतींचे वर्णन (नवीन जुने सर्व्हे नंबर)**
**मौजे : शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४५ | १/१७ | ३–१७–६ | ३८.३६ |
| २ | ४५ | १/१९ | ०–१७–७ | २.४७ |

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने प्रोबेट दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. सदरच्या नोटीसीस मुदतीत हरकत न आल्यास प्रोबेट दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२५/११/२०२० रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## बंद घर फोडून चोरी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण घारापुरी येथील पूनम ओमप्रकाश धिंग्रा यांच्या बंद घरात घुसून सामानाची चोरी केल्याची घटना घडली. चोरीत ८ हजारांचा मुद्देमाल चोरी केल्याची नोंद पोलीस स्टेशनला दाखल आहे.

पूनम ओमप्रकाश धिंग्रा यांचे कुटुंब नोकरी निमित्त अंबरनाथ येथे वास्तव्यास आहेत. त्यांच घर हे घारा-पुरीत आहे. ते घर बंद अवस्थेत असते याचाच फायदा उठवत चोरट्यांनी घराच्या छताचे पत्रे काढून आतमध्ये प्रवेश करीत घरातील स्टीलची टाक्या, ताटे, ग्लास, कळश्या, पितळी हांडे, ताटे, तांबे, चमचे, पातेले, गॅस सिलेंडर, शेगडी, फॅन, कुकर, बालदी आदीं ऐवज लंपास केला असल्याचे समजते. त्याची अंदाजे किंमत ८ हजार असल्याचे समजते. याची तक्रार पूनम धिंग्रा यांनी मोरा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. याविरोधात अज्ञात चोरट्यांविरोधात ४५४, ४५७ व ३८० कलमाखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास मोरा पोलीस करीत आहेत.

## मुंबई-गोवा हायवे वरील धुक्यात हरविल्या वाटा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा हायवे वरील काळ पासुन धुक्यात हरवली वाट असे चित्र पहावयास मिळत असुन त्यामुळे मॉर्निंग वाकला करणाऱ्यांसाठी हा सुखद धक्का असला तरी कामावर जाणारे कामगार वर्ग,दुध विक्रेते यांच्यासाठी यातुन वाट काढताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

हुडहुडी भरविणारा नोव्हेंबर महिना संपत आला तरी गुलाबी थंडीची चाहुल लागत नव्हती निसर्ग नियमानुसार ऋतु चक्र चालण्याचे दिवस बदलत चालले असुन याचे प्रत्यय आपणास येत असुन कधी गरम तर कधी पाऊस अशी परिस्थिती नोव्हेंबर महिन्याच्या शेवट पर्यत दिसुन आली परंतु उशिरा का होईना नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी गुलाबी थंडीची चाहुल अखेर लागली असुन उबदार कपडे खरेदीसाठी लोकांची गर्दी दिसुन येत आहे.

दिवसेंदिवस काळ बदलत चालला असुन संगणक युगात जोतो मोबाईल व दूरदर्शन मध्ये गुंतला असुन थंडीच्या वेळी शेकोटी सभोवताली उब घेऊन गप्पा मारणारे यांचे प्रमाण ही कमी झाले.रिती रिवाज परंपरा बदलत चालल्या असुन याच प्रमाणे निसर्ग ही बदलत चालला आहे.परंतु उशिरा का होईना गुलाबी थंडी सूरू झाली असुन याचा आनंद उपोभोगत असतांना सकाळी या धुक्यातून वाट काढतांना आपले लक्षही विचलित होऊ देऊ नये याचे भान सर्वानी ठेवावे.



# वाकण-पाली-खोपोली महामार्ग गेला खड्ड्यात?

## निकृष्ट दर्जाचे काम, जागोजागी रस्त्याला खड्डे एमएसआरडीसीच्या दुर्लक्ष?

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

वाकण - पाली - खोपोली राज्य महामार्गाच्या रुंदीकरण व काँक्रिटीकरणाचे काम २०१६ पासून सुरू आहे. चार वर्षांपासून संथ गतीने सुरू असलेले काम, रस्त्यावरील खड्डे आणि निकृष्ट दर्जाचे काम अशा विविध समस्येच्या गर्तेत हा महामार्ग सापडला आहे. त्यामुळे १९८ कोटी रुपयांचा चुराडा होताना दिसत आहे.



या मार्गाचे काम सुरू झाल्यावर वाहनचालक व प्रवाशांना अत्यंत उत्तम दर्जेदार रस्ता मिळणार अशी अपेक्षा होती. मात्र, यावर पाणी फिरतांना दिसत आहे. सुरुवातीस हा मार्ग बनविण्याचे काम ज्या ठेकेदाराला दिले होते. त्या निकृष्ट दर्जाचे व ढिसाळ कामामुळे त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले. त्यानंतर बेग कन्ट्रक्शन (बीसीसी) यांना देण्यात आले. त्याही कंत्राटदाराचे कामदेखील निकृष्ट दर्जाचे व ढिसाळ असल्याचे आता तर काय तीस-या ठेकेदाराला हे काम देण्यात आल्याचे एमएसआरडीसी अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.वाकण पाली खोपोली महामार्गाचे काम म्हाणजे नकटीच्या लग्नाला अनेक विघ्न असेच म्हणावे लागेल. आजवर बरेच ठेकेदार बदलून ही वाकण पाली खोपोली महामार्गाचे रस्त्याची आजही दुरवस्था आहे.

नव्याने बांधण्यात आलेला काँक्रीटच्या रस्त्याला अक्षरश: भेगा पडल्या आहेत. अर्धवट कामामुळे रस्ता ठिकठिकाणी खराब झाला आहे. अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. वाहने चाल-वताना त्रास सहन करावे लागत आहे. वाहने जाऊन खड्ड्यातील माती निघून खड्डेदेखील वाढले आहेत.

याबरोबरच नव्याने तयार केलेल्या काँक्रीटच्या रस्त्यांचा दर्जा ढासळत चालला आहे. खड्डे व रस्ता फुटला आहे.आणि निकृष्ट रस्त्यामुळे अपघातांमध्ये वाढ होत आहे. अशा असंख्य कारणांमुळे या मार्गावरून प्रवास करणे अवघड झाले आहे. ४ वर्षांत अवघे ३९ किमीचे हे काम पूर्ण झाले नाही. आता एमएसआरडीसी नव्याने नेमलेल्या ठेकेदार ते तरी वाकण पाली खोपोली महामार्गाचे काम पूर्ण करतील का? कि चार दिन की चांदनी फिर अंधेरी रात अशी अशी परिस्थिती राहणार का ? अशी चर्चा प्रवासी वर्गाकडून होत आहे.

या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत आहे. त्यामुळे शासनाचे कोट्यवधी रुपये पाण्यात जाणार असल्याचे दिसत आहे. आधीचा डांबरी रस्ता बरा होता, असे म्हणावे लागत आहे. शासन कोट्यवधी रुपये खर्च करते, पण रस्त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष देत नाही.लवकरातलवकर चांगल्या दर्जाचे कामे करावी अन्यथा एमएसआरडीसीच्या विरोधात जनअंदोलन उभे केले जाईल,

**- राजेश मपारा दक्षिण भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुधागड-पाली**

## सरकारी कर्मचाऱ्यांचा उद्या लाक्षणिक संप ; तहसिलदारांना निवेदन




**दै.रायगड नगरी । आगरदांडा**

राज्य सरकारी कर्मचारी, शिक्षकांच्या देशव्यापी लाक्षणिक संपात तालुका राज्य सरकारी, निमसरकारी, जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे उदया गुरूवारी २६ नोव्हेंबर रोजी होणा-या लाक्षणिक संपात सहभागी होणार असुन या बाबतचे निवेदन राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना मुरूड तालुकेच्या अध्यक्षा- रीमा कदम यांनी मुरूड तहसिलदार गमन गावित यांना याबाबतच रितसर निवेदन देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष रीमा कदम, सरचिटणीस वनिता पाटील, सदस्य -म्हात्रे मॅडम, कार्याध्यक्ष- संतोष पवार, सदस्य -राजु भोये, विकास बोंडले, सुमित उजगरे, विजय सूर्वासे, केतन भागात आदिसह कर्मचारी उपस्थित होते. राज्य सरकारी कर्मचारी शिक्षकांसाठी अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने गेल्या ६० वर्षापासुन केंद्र व राज्य पातळीवर सततचा लढा दिला आहे. त्यामुळेच देशातील २७ राज्यातील ८० लाख राज्य सरकारी कर्मचारी या महासंघाच्या छत्राखाली भक्कमपणे गेली सहा दशके एकसंघ राहिले आहेत. सर्वाना १९८२ ची जुनी पेंशन योजना लागु करा, खाजगीकरण, कंत्राटीकरण धोरण रद्द करून सध्याच्या अंशकालीन व कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा नियमित करा, मुदतपुर्व सेवा, निवृर्तीचे जाचक धोरण रद्द करा, नवीन कामगार कायदे रद्द करा, केंद्रीय कर्मचा-यांना देय ठरणारे सर्व भते राज्य सरकारी कर्मचा-यांना लागु करा, सर्व सहवर्गातील रिक्त पदे तात्काळ भरा व ही पदे भरताना अनुकंपा तत्वावरील नियुक्ता विनाअट करा, प्रत्येक गरजु व्यक्तीला मनरेगामार्फत किमान २०० दिवसांचा रोजगार मिळेल, असे धोरण लागु करा अशा विविध १३ मागण्यांकडे केंद्र व राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी उदया २६ नोव्हेंबरला देशातील कामगार कर्मचारी शिक्षक देशव्यापी लाक्षणिक संपावर जाणार आहेत.

## दिव्यांग बांधवावर होणारा अन्याय कधीही सहन केला जाणार नाही : साईनाथ पवार

**दै.रायगड नगरी । तळा**

दिव्यांग बांधवावर विविध क्षेत्रात अन्याय केला जात आहे असे निदर्शनास येत असून माझ्या बांधवांना अपमानास्पद वागणूक दिली आहे. सामाजिक क्षेत्र असो अगर शासकीय सेवेत असो त्यावर झालेला अन्याय सहन केला जाणार नाही असे राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांनी व्यक्त केले.

त्यापुढे म्हणाले की केंद्र सरकारने दिव्यांग बांधवांना नोकरी सामावून घेतले आहे.तसेच सर्व सामान्य दिव्यांग बांधवांना यु डी.आय डी. डिजिटल कार्ड वितरीत केले आहे. हे भारत सरकारने कायद्यानुसार दिले आहे हे ग्राह्य धरण्यात येते. परंतु नुकताच एस टी महामंडळाच्या वाहकाकडुन माणगांव आगाराच्या पनवेल बस मधील महीला वाहक यांनी नागोठणे ते पनवेल प्रवास करणाऱ्या दिव्यांग बांधवाला अपमानास्पद वागणूक देऊन कार्ड भिरकावून दिले व सरकारच्या कारभारावर देखील नाराजी व्यक्त केली. सदर बांधवाने महीला वाहकाशी हुज्जत न घालता रितसर कायदेशीर तक्रार नागोठणे बस स्थानक व पोलिसात केली आहे.

प्रवासी भाड्यात सवलत असताना नियतभाडे तिकीट दिले. बेकायदेशीर असून अपंग २०१६कायदा अंतर्गत कारवाई व्हावी. या दिव्यांग बांधवाला योग्य न्याय व वाहकावर कडक कारवाई केल्याशिवाय गप्प बसणार नाही.

याबाबत विभाग नियंत्रक पेण यांच्या कडे कारवाईची मागणी केली जाईल अशी माहिती पत्रकारांना दिली

## शहीद कार सेवकांच्या स्मरणार्थ बजरंग दलाचे रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

विश्व हिंदू परिषद व बजरंग दल पनवेल प्रखडच्या वतीने शहीद कार सेवकांच्या व भारतीय सीमेवर देशाचे रक्षण करताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ आदरांजली अर्पण करण्यासाठी पनवेल जळवली तळोजा मजकूर मधील विद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हिंदुत्वनिष्ठ नागरिकांनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला.

अयोध्या येथील राम मंदिर पुनर्बांधणीसाठी कार सेवा करताना शहीद झालेल्या कार सेवकांच्या व सीमेवर शत्रूशी लढताना वीरमरण प्राप्त झालेल्या शहीद जवानांच्या स्मरणार्थ पनवेल जवळील तळोजा मजकूर येथील कमरू पाटील माध्यमिक विद्यालयात बजरंग दलाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पनवेलमधील विविध हिंदुत्व-वादी संघटना सहभागी झाल्या होत्या. कामोठे येथील एमजीएम हॉस्पिटल व बजरंग दलाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी सहभाग नोंदविला. मात्र कोरोनाचे संकट असताना सर्व सोशल डिस्टंसिंग चे नियम पाळीत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी शिवसेनेचे सल्लागार बबनदादा पाटील ,बजरंग दलाचे कोकण प्रांत संयोजक संदीप भगत, धनाजी महाराज पाटील ,नगरसेवक हरीश केणी, राष्ट्रवादीचे विजय मयेकर माजी सरपंच खोबाजी पाटील बजरंग दल सहसंयोजक संतोष मोकल तसेच बजरंग दलाचे विविध पदाधिकारी या प्रसंगी प्रमुख उपस्थित होते.


राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
श्री.वाय.एस.भोपी

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं. ५३६/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.१३/०१/२०२१

१) श्री.विष्णू काशिनाथ म्हात्रे
वय : ५८ वर्षे, धंदा : शेती
रा.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.अलका परशुराम काथारा
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
रा.नेवाळी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै.काशिनाथ तुकाराम म्हात्रे हे दि.२५/०२/२०२० रोजी अवेन्यू बिल्डींग, प्लॉट नं.१७ बी, सेक्टर नं.०८, रुम नं.२०२, उलवे, ता.पनवेल येथे मयत झालेले आहेत. अर्जदार श्री.विष्णू काशिनाथ म्हात्रे... वगैरे हे त्यांचे खालील मिळकतीचे मोबदल्यात मिळणाऱ्या १२ १/२% भूखंडासंबंधी कायदेशीर वारसदार आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गु.पॉ. |
|---|---|---|---|
| उलवे | ८६ | १ पी | ०-३०-० |

श्री.विष्णू काशिनाथ म्हात्रे... वगैरे हे कै.काशिनाथ तुकाराम म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात जर ह्या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास हे मे.कोर्ट श्री.विष्णू काशिनाथ म्हात्रे... वगैरे ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेणेची कार्यवाही करेल व ते जर कै. काशिनाथ तुकाराम म्हात्रे यांचे वारसदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/११/२०२० रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : चिरवत, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक/भोगवटाधारक श्री.सुदाम बाळा भोपी आणि इतर, राहणार मौजे : चिरवत, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक/ भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : चिरवत, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १५ | २/अ | ००.२९.१० पो.ख. ०.०३.०० | ६.६९ |

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री.सुदाम बाळा भोपी आणि इतर यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/११/२०२०

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्र.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : वडवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक/भोगवटाधारक श्री.भगवान बुधाजी पाटील, राहणार मौजे : वडवली, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायमस्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक/ भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वडवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १७ | ८ | ००.०५.१० पो.ख. ०.००.२० | ०.१२ |

तरी वर नमूद जमिनीवर/मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री.सुदाम बाळा भोपी आणि इतर यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत. असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/११/२०२०

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळमजला, श्री.बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्र.२८, सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीतील अविभाज्य मालकी हक्काची मिळकत ही सदर मिळकतीचे मालक व कब्जेदार १) श्रीमती. इंदूबाई मारुती यादव, २) श्री.बळीराम मारुती यादव, ३) सौ.मंगळ उर्फ प्रमिला प्रफुल्ल पवार, रा.वनवे, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड, ४) श्रीमती.सविता गणेश यादव, ५) श्री.विजय गणेश यादव, अ.क्र.१, २, ४ व ५ सर्व राहणार मुक्कम बीडखुर्द, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड आणि ६) सौ.लिलाबाई उर्फ कल्पना गुरुनाथ मांडे, रा.मुक्काम लोधिवली, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड यांचेकडून विकत घेण्याचा व्यवहार करीत असून उभयपक्षी यांचेत त्याबाबत साठेकरार करण्यात आलेला आहे. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बीडखुर्द, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४८ | ६/ब/२ | २-६५-00 पो.ख.१-४०-00 एकूण ४-०५-00 | ०२.५५ |
| **या जमीन मिळकतीपैकी विक्री योग्य क्षेत्र दक्षिण दिशेकडील १ हे-८३ आर-० पॉ. इतक्या मोजमापाच्या अविभाज्य जमीन मिळकतीबाबतचे** | | | | |

वर तक्त्यात नमूद जमीन मिळकतीस चतुःसीमा येणेप्रमाणे आहेत.

पूर्वेस : लागून भूमापन क्र.६५ ची मिळकत
पश्चिमेस : लागून भूमापन क्र.७८ च्या मिळकती व गावठाण
दक्षिणेस : लागून भूमापन क्र.७९ ची मिळकत
उत्तरेस : याच भूमापन क्र.४८ मधील उर्वरित मिळकत

तरी सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने सुचित करण्यात येत आहे की, वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क-हितसंबंध व अधिकार असल्यास आणि अगर कोणाही व्यक्ती, इसम, संस्थेने वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीवरील भोगवटादार सदरी नावे असलेल्या एक वा अनेक व्यक्तींशी फरोक्तखत, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, एम.ओ.यु., भाडेपट्टा, गहाण, दान, बक्षिसपत्र वगैरे अगर अन्य प्रकारे कोणताही कायदेशीर मालकी हक्क-हितसंबंध, ताबेकब्जा, वहिवाट वापर वगैरे अधिकार व हक्क निर्माण केला असल्यास अशा व्यक्ती, इसम, संस्थेने सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या मुदतीत आपला कायदेशीर हक्क व अधिकार कागदोपत्री पुराव्यानिशी आमचेकडे सिद्ध करावा.

अन्यथा अशी हरकत वर नमूद केलेल्या मुदतीत आम्हास न मिळाल्यास वरील वर्णनाच्या जमीन मिळकतीच्या खरेदी-विक्री व्यवहारास कोणाचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत नसल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी-विक्री व्यवहार करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

स्थळ : पनवेल
दिनांक : २३/११/२०२०

**सही/-**
**सलिल अब्दुलरहमान शेख**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**१, स्वप्नपूर्ती, १३४६ बी/१, शाह प्लाझा जवळ, प्रभु आळी, पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८६९०८७३९९**